महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २५ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ११९ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## लक्षवेधी

### नवी मुंबई विमानतळ नामकरणावरून पुन्हा आंदोलनाची चिन्हे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याच्या दीर्घकाळ प्रलंबित मागणीला पुन्हा एकदा नवे वळण मिळाले आहे. कल्याण तालुक्यातील तिसगाव परिसरातून या मागणीला नव्याने गती मिळाली असून, स्थानिक ग्रामस्थांनी स्वतः पुढाकार घेऊन 'लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ, नवी मुंबई 36 KM from Tisgaon' असे फलक गावात उभारले आहेत. 'श्री तिसाई ग्रामस्थ मंडळ आणि नियोजन समिती, तिसगाव' यांच्या सौजन्याने लावण्यात आलेले हे फलक आता हा प्रश्न पुन्हा एकदा एरणीवर आला आहे. दि. बा. पाटील हे रायगड जिल्ह्यातील शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि शेतकऱ्यांचे खरे रक्षक मानले जातात.

सिडको आणि जेएनपीटी प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्या हजारो शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. त्यांच्या प्रयत्नांमुळेच भूमिपुत्रांना विकसित भूखंड आणि योग्य मोबदला मिळवून देण्यात यश आले. या लढ्यामुळे दि. बा. पाटील हे स्थानिक आगरी-कोळी समाज आणि प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी अस्मितेचे प्रतीक ठरले. म्हणूनच, नवी मुंबई ज्या भूमीवर वसली आहे, त्या भूमिपुत्रांच्या सन्मानार्थ विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे.

## आयुषच्या ४२८५ रिक्त जागांसाठी आज तिसरी यादी

### दुसऱ्या फेरीपर्यंत ९ हजार २१० जागांवर प्रवेश निश्चित




**होमिओपॅथी (बीएचएमएस) या अभ्यासक्रमासाठी राज्यातील ५५ महाविद्यालयांमध्ये ३ हजार ७४० जागा उपलब्ध आहेत. यामध्ये सरकारी महाविद्यालयामध्ये ५४, तर ५४ खासगी महाविद्यालयांमध्ये ३ हजार ६८६ जागा आहेत. सरकारी महाविद्यालयातील २३ जागांवर प्रवेश झाले असून, ३१ जागा रिक्त आहेत. तर खासगी महाविद्यालयांतील १ हजार ९४० जागांवर प्रवेश झाले असून, १ हजार ७४६ जागा रिक्त आहेत. त्यामुळे बीएचएमएस अभ्यासक्रमाच्या तिसऱ्या फेरीसाठी १ हजार ७७७ जागा रिक्त आहेत.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** आयुष अभ्यासक्रमाच्या दोन फेऱ्यांना मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून शनिवारी तिसऱ्या फेरीसाठीची निवड यादी जाहीर करण्यात येणार आहे. आयुष अंतर्गत येणाऱ्या आयुर्वेद, होमियोपॅथी आणि युनानी अभ्यासक्रमाच्या राज्य कोट्यातील १३ हजार ४९५ पैकी ९ हजार २१० जागांवर आतापर्यंत प्रवेश झाले असून, तिसऱ्या फेरीसाठी ४ हजार २८५ जागा रिक्त राहिल्या आहेत. आयुर्वेद (बीएएमएस) अभ्यासक्रमाच्या राज्यातील २२ आणि ११७ खासगी अशा एकूण १३९ महाविद्यालयांमध्ये राज्य कोट्यासाठी ९ हजार ४०६ जागा उपलब्ध होत्या. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये ६ हजार ९३१ जागांवर प्रवेश झाले. यामध्ये सरकारी महाविद्यालयामधील १ हजार ५२८ पैकी १ हजार २२४ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. तसेच खासगी महाविद्यालयांमधील ७ हजार ८७८ जागांपैकी ५ हजार ७०७ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. त्यामुळे बीएएमएस अभ्यासक्रमासाठी २ हजार ५७५ जागा रिक्त असून, यात सरकारी महाविद्यालयांमधील ३०४ आणि खासगी महाविद्यालयांमधील २ हजार १७१ जागांचा समावेश आहे.

## ठाकरे गटाचे ठाणे ग्रामीण संपर्कप्रमुख साईनाथ तारे यांचा राजीनामा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनिधी



**कल्याण -** मागील काही दिवसांपासून स्थानिक पातळीवरील उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून वाईट अनुभव येत होते. दिवाळी सणाच्या गोड कालावधीत कटू अनुभव आले. त्यामुळे आपल्या कार्यपध्दतीप्रमाणे काम करण्यास मिळत नसेल तर पक्षाची जागा अडवून ठेवणे योग्य नाही, म्हणून आपण उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या ठाणे ग्रामीण संपर्कप्रमुख पदाचा राजीनामा दिला आहे, अशी माहिती कल्याणमधील ठाकरे गटाचे वजनदार पदाधिकारी आणि ठाणे ग्रामीण संपर्कप्रमुख साईनाथ तारे यांनी माध्यमांना दिली.

आपण पक्षप्रमुखांवर अजिबात नाराज नाही. त्यांचे नेहमीच सहकार्य मिळाले. आपले भाजप, शिंदे शिवसेना आणि इतर पक्षातील नेत्यांशी मित्रत्वाचे संबंध आहेत. राजकारण आणि समाजकारण असे दोन स्वतंत्र भाग करून आपण आपली वाटचाल ठेवील आहे. त्यामुळे सर्व पक्षांशी आपले चांगले संबंध आहेत. आपण कोठे जाणार हे अद्याप निश्चित नाही. पण योग्य वेळी निर्णय घेऊ, असे तारे म्हणाले. असे तारे यांनी सांगितले.

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग १० पदरी होणार !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबईः** राज्यातील सर्वात मोठी दोन शहरे म्हणजे मुंबई आणि पुणे. या शहरांना सध्या दोन महामार्गांनी जोडले जाते. एक म्हणजे, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व दुसरा मुंबई-पुणे जुना महामार्ग. वाहनांची वाढती संख्या लक्षात घेता हे दोन्ही महामार्ग अपुरे पडत आहेत. त्यामुळे मुंबई-पुणे महामार्ग १० पदरी करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) तयार केला आहे. येत्या दहा ते बारा दिवसात हा प्रस्ताव लवकरच राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठवला आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या महत्त्वाच्या महामार्गाचे दहा पदरी सुपरहायवेमध्ये रूपांतर करण्याची तयारी करत आहे. त्यामुळे महामार्गावरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होईल. पूर्वी या महामार्गाला केवळ आठ पदरी करण्याची योजना होती, परंतु आता त्यात सुधारणा करून १० पदरी विस्तार केला जाणार आहे. १० पदरी विस्तारासाठी अतिरिक्त १४२० कोटी रुपये खर्च येणार आहे. एकूण बांधकामाचा खर्च ८४४० कोटी होईल. एमएसआरडीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अंदाजानुसार, एकूण प्रकल्प खर्च सुमारे १४,२६० कोटी आहे. या दहा पदरी महामार्गाला मंजूरी मिळाल्यास, वाढत्या वाहनांच्या संख्येशी जुळणारा हा भारतातील सर्वात मोठा एक्सप्रेसवे ठरेल.

### खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत


## अंबरनाथच्या दोन माजी नगरसेवकांचे शिवसेनेत पक्षांतर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

प्रतिनीधी

**अंबरनाथ :** अंबरनाथ पश्चिमेतील राष्ट्रवादी काँग्रेस-शरद पवार गटाचे माजी नगरसेवक उमर दादामिया इंजिनियर आणि भाजपच्या माजी नगरसेविका दिपा गायकवाड यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनीही शिवसेनेचा भगवा हाती घेतला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मुख्य उपस्थितीत हा पक्षप्रवेश पार पडला. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी सर्वांचे शिवसेनेत स्वागत करून त्यांना पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या प्रवेशामुळे अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रात शिवसेनेला आणखी बळ मिळेल अशी शक्यता आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात शिवसेनेचा विस्तार वेगाने होत असून विविध पक्षातील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर शिवसेनेत प्रवेश घेत आहेत. आगामी महापालिका, पालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद या सर्व निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पान ३ वर ▶▶▶

## ठाकुर्ली उड्डाण पुलावरील जीवघेणे फलक हटविले



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली -** ठाकुर्ली रेल्वे उड्डाण पुलावर गेल्या काही दिवसांपासून रेल्वे मार्गिकांच्यावर पुलाच्या कठड्याला अज्ञात नागरिकांनी कल्याण डोंबिवली पालिकेच्या परवानग्या न घेता बेकायदा फलक लावले होते. हे फलक पुलावरून जाणाऱ्या प्रवाशांच्या अंगावर किंवा वाऱ्याने उडून रेल्वे मार्गाच्या दिशेने उडून लोकल, एक्सप्रेसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या डोक्यात पडण्याची शक्यता होती. या बेकायदा जीवघेण्या फलकांची माहिती मिळताच पालिका फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी फेरीवाला अतिक्रमण नियंत्रण पथकाच्या साहाय्याने हे फलक तातडीने काढून टाकले.

ठाकुर्ली पुलावर कोणीही बेकायदा फलक लावले तर त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याचा इशारा साहाय्यक आयुक्त मुंबरकर यांनी दिला आहे. गेल्या काही दिवसांपासून ठाकुर्ली पुलाच्या दोन्ही बाजुला टुकार दादा, भाईंचे वाढदिवस, सण, उत्सवांच्या शुभेच्छांचे फलक लावण्यात येत आहेत. सोसायट्याचा वारा आला की दोरीने बांधलेले हे फलक तुटून रेल्वे मार्ग किंवा रस्ते मार्गावर पडतात. हे फलक रस्ते मार्गावरून जाणाऱ्या दुचाकी स्वारांच्या अंगावर पडले तर गंभीर दुखापत होण्याची शक्यता आहे. तसेच रेल्वे मार्गावरून धावणाऱ्या मेल, लोकलच्या समोर, दारात उभ्या असलेल्या प्रवाशांच्या अंगावर पडून अपघाताची शक्यता होती.



## रस्तावर खडी रेती टाकल्याने अपघात मामणोलीतील एकाचा जागीच मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण मुरबाड रस्त्यावर कोळीम गावाजवळ रस्त्यावर खडी टाकल्यामुळे झालेल्या अपघातात स्कुटी चालक मारुती हरणे वय 55 यांच्या जागीच मृत्यू मामणोली ग्रामस्थ संतप्त खडी, रेती टाकणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची ग्रामस्थांची मागणी.

कल्याण मुरबाड रस्तावर खडी रेती टाकल्याने हा अपघात झाला आहे. त्यामुळे हकनाक माणसाचा जीव गेला असल्याची चर्चा ग्रामस्थांत सुरु आहे.



दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com






# साई समर्थ सोसायटीच्या नामफलकाचे अनावरण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण शहरालगत असलेल्या आणि नवीन वसाहत निर्माण झालेल्या मळेघर ग्रामपंचायत अंतर्गत वडगाव येथे अनेक कुटुंब एकत्र येऊन सोसायटी स्थापन करण्याचा निश्चय केला आणि श्री साई समर्थ रहिवासी सेवा संघ या नव्याने स्थापन केलेल्या सोसायटीच्या नामफलकाचे उद्घाटन माजी नगरसेवक शोमेरभाई पेणकर शिवसेना पेण शहर प्रमुख सुहास पाटील सामाजिक कार्यकर्ते मधुकर पाटील यांच्या उपस्थितीत श्री साई समर्थ रहिवासी सेवा संघ या सोसायटीच्या नामफलकाचे फीत कापून अनावरण करण्यात आले यावेळी सोसायटीचे अध्यक्ष वासुदेव म्हात्रे उपाध्यक्ष शशिकांत कोळी सेक्रेटरी चेतन मोकल खजिनदार राहुल निंबळे पदाधिकारी धनाजी घरत पदमाकर मोकल राहुल म्हात्रे, कोळी सर यांच्यासह अनेक सभासद उपस्थित होते. सुत्रसंचलन धनाजी घरत यांनी केले.

यावेळी उद्घाटन प्रसंगी शोमेर पेणकर यांनी बोलताना सांगितले की संपूर्ण वडगाव मध्ये सर्वात जास्त सुशिक्षित सोसायटी जर कोणती असेल तर ती साई समर्थ सोसायटी आहे कारण या सोसायटीच्या साई समर्थ या नावातच सगळे आले आहे त्यामुळे संपूर्ण वडगाव मध्ये ही सोसायटी नावलौकिक मिळेल असा आशावाद व्यक्त केला आणि या सोसायटी मधील ज्याकाही समस्या अडचणी किंवा कामे अपूर्ण राहिले आहेत ती लवकरात लवकर पूर्ण करून देण्याचा मानस शोमेर पेणकर यांनी व्यक्त केला. शेवटी आभार चेतन मैकल यांनी केले.

# शहरे गुदमरली ; श्वास कोंडला





सर्वोच्च न्यायालयाने आदेश देऊनही दिवाळीच्या दिवसात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या फटाकेबाजीमुळे देशातील प्रमुख शहरात रात्रीच्या वेळेत हवा प्रदूषणात प्रचंड वाढ झाल्याचे समोर आले आहे. मंगळावर ते बुधवार या तिन्ही दिवशी देशातील प्रमुख शहरांच्या हवेचा निर्देशांक वाईट स्तरावर होता त्यामुळे आधीच प्रदूषित असलेल्या शहरांची हवा आणखी प्रदूषित झाली. वास्तविक फटाकेमुक्त, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा असे आव्हान अनेक सामाजिक आणि सेवाभावी संस्थांनी केले होते. शालेय शिक्षण विभागाने तर शालेय विद्यार्थ्यांना फटाके उडवणार नाही अशी शपथ दिली. न्यायालयाने फटाके उडवण्यास परवानगी दिली मात्र वेळेचे बंधन घातले या सगळया आव्हानांकडे नागरिकांनी दुर्लक्ष करून मनसोक्त फटाकेबाजी केली वास्तविक फटाक्यांचे दुष्परिणाम सर्वांना माहीत आहे तरीही दरवर्षीप्रमाणे यावर्षीही सरकारच्या आणि सेवाभावी संस्थांच्या आव्हानाला हरताळ फासत सर्वत्र फटाक्यांचा बेसुमार धूर काढण्यात आला त्याच्या व्हायचा तो परिणाम झालाच. फटाक्यांमुळे अनेक शहरांची हवा प्रदूषित झाली विशेषतः मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे यासारख्या मोठ्या शहरातील हवेचे प्रदूषण चिंता वाटावी इतक्या गंभीर पातळीवर जाऊ लागले. जी शहरे कमी प्रदूषित श्रेणीत गणली जात होती त्या शहरातही हवेचे प्रदूषण कमालीचे वाढल्याचे समोर आले आहे. मुंबई पुण्याच्या तुलनेत ग्रामीण भागात कमी प्रदूषण असते मात्र यावेळी ग्रामीण भागातही प्रदूषण कमालीचे वाढले. ग्रामीण भागात पहिल्यांदाच इतके प्रदूषण वाढल्याचे पाहायला मिळाले. या प्रदूषणाला फटाकेच जबाबदार आहेत. दिवाळीत बेसुमार फटाकेबाजी करण्यात आली त्यामुळे चांगली हवा असलेली शहरे अशी ओळख असलेल्या शहरांचीही प्रदूषित शहरांत गणना होऊ लागली. अर्थात मुंबई, नवी मुंबई, ठाणे हीच शहरे नाही तर पुणे, नागपूर, छत्रपती संभाजी नगर यासारख्या शहरातही फटाक्यांच्या आतषबाजीने प्रदूषण वाढले. केवळ राज्यातीलच नाही तर देशातीलही अनेक शहरात फटाक्यांमुळे प्रदूषण वाढले. विशेष म्हणजे देशातीलच नव्हे तर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दिल्ली शहरातील हवा मात्र समाधानकारक या श्रेणीत गणली गेली आहे. दिल्लीतील हवा अतिप्रदूषित या श्रेणीतून समाधानकारक श्रेणीत गणली गेली याचे कारण म्हणजे यावर्षी दिल्लीत फटाके वाजवण्यास बंदी घालण्यात आली होती आणि या बंदीचे कसोशीने पालन करण्यात आले होते या उलट आपल्या राज्यात मात्र उत्सवाच्या नावाखाली लोकांनी मनमानी करत बेसुमार फटाक्यांची आतषबाजी केली त्यामुळेच दरवर्षीपेक्षा यावर्षी अधिक प्रमाणात फटाके उडवण्यात आले त्याचाच परिणाम म्हणजे राज्यातील अनेक शहरे अतिप्रदुषित किंवा प्रदूषित श्रेणीत गणली गेली. अर्थात हवा प्रदूषित होण्यास केवळ फटाके हेच एकमेव कारण आहे असे नाही तर वाढती वाहने हे ही एक महत्वाचे कारण यामागे आहे मात्र दिवाळीत प्रदूषणाची पातळी खूप वाढते हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही आता हेच पहा ना सोमवारी संध्याकाळी पुण्याच्या हवेची पातळी समाधानकारक या श्रेणीत होती ती अवघ्या चोवीस तासात वाईट या श्रेणीत पोहचली याचाच अर्थ बेसुमार फटाकेबाजीने हवा प्रदूषित झाली. हवा प्रदूषित झाल्याने शहरांचा जीव गुदमरला आणि नागरिकांचा श्वास कोंडला.

दिवाळी नंतर अस्थमाच्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे पाहायला मिळाले. या दूषित हवेचा सर्वाधिक फटका लहान मुले, वृद्ध नागरिक व व्याधीग्रस्त रुग्णांना बसला शिवाय फटाक्यांमुळे अनेक ठिकाणी दुर्घटना घडल्याच्या बातम्याही आपण टीव्हीवर पाहिल्या. अनेक मुले फटाक्यांमुळे जखमी झाले तर काही ठिकाणी फटाक्यांमुळे आग लागून दुर्घटना घडल्या त्यात मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. हे सर्व टाळायचे असेल तर किमान पुढील वर्षांपासून तरी फटाकेमुक्त दिवाळी साजरी करायला हवी. सरकारनेही फटाक्यांवर बंदी आणायला हवी आणि हो ही बंदी केवळ दिवाळी पुरतीच नको तर कायमस्वरूपी हवी कारण दिवाळी व्यतिरिक्त इतरवेळीही फटाके वाजवले जातात दिवाळीत त्याचे प्रमाण अधिक असते इतकेच कदाचीत त्यामुळेच दिवाळीत फटाक्यांचे दुष्परिणाम तीव्रतेने दिसून येतात.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमुक्त करा

## युवासेनेची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामिण** : शहापूर तालुक्यात अवकाळी पावसाने व अचानक झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून शेतकऱ्याची पार कंबरडे मोडले आहे आता तोंडाशी आलेला घास अचानक आलेल्या पावसाने हिरावून घेतला असून शेतकरी पुरता हवालदिल बनला आहे त्यामुळे शासनाने याची लागलीच दखल घेऊन त्वरित नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देऊन संपूर्ण कर्जमुक्त करावे अशी मागणी युवासेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शहापूर तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

युवा सेना जिल्हा युवाधिकारी स्वानंद शेलवले यांच्या नेतृत्वाखाली तर युवाधिकारी अतुल भालके, उपजिल्हा युवासेना युवा अधिकारी विकी चंदे, तालूका सचिव सुनील घोडविंदे, शहापूर शहर युवाअधिकारी हर्षद राऊत, उपतालुका युवाधिकारी गणेश विशे, उपशहर युवा अधिकारी सनी चंदे, प्रणित चंदे आदी पदाधिकारी यांच्या समवेत हे निवेदन देण्यात आले.

शहापूर तालुक्यात झालेल्या अवकाळी व अतिवृष्टी पावसामुळे सर्व भातपीक पाण्याखाली जाऊन भात पिकांचे प्रचंड नुकसान झाले. यामुळे शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे. या संकटातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी शेतीच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्यात यावा तसेच महाविकास आघाडीच्या काळात उद्धवजी ठाकरे मुख्यमंत्री असताना सरसकट कर्जमाफी केली होती. त्या अनुषंगाने महायुती सरकारने महाराष्ट्रातील शेतकरी कर्जमुक्त करावे असे युवा सेना जिल्हा युवाधिकारी स्वानंद शेलवले यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

तसेच 10 ऑक्टोबर 2025 रोजी काढलेल्या सुधारित शासन निर्णयात सवलतींपासून वगळलेल्या ठाणे जिल्ह्याला जमीन महसूलात सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन,शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती (एक वर्षासाठी),तिमाही वीज बिलात माफी,परीक्षा शुल्कात माफी व 10 वी आणि 12वी च्या विद्यार्थ्यांची फी माफी सवलती लागू कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

# मोहने येथील वादात दोन वर्षांच्या चिमुकलीवर गुन्हा दाखल

## पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण नजीक असलेल्या मोहने येथे फटाके फोडण्याच्या वादातून दोन गटात झालेल्या राड्याबाबत दोन्ही गटांच्या विरोधात परस्परविरोधी गुन्हे खडकपाडा पोलिस ठाण्यात दाखल केले होते. त्यापैकी एका गटाच्या गुन्ह्यात एका दोन वर्षाच्या मुलीला आरोपी केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

या घटनेत जखमी असलेल्या संध्या साठे यांनी सांगितले की, त्यांच्यासह अनेकांना एका गटाकडून मारहाण झाली. आमच्यापैकी जखमींना वैद्यकीय तपासणी करण्यासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. जखमींमध्ये आमच्यासोबत असलेली एक दोन वर्षाची मुलगी होती. पोलिसांनी या दोन वर्षाच्या मुलीलाही गुन्ह्यात आरोपी केले. ही बाब जेव्हा आरोपींना शुक्रवारी न्यायालयात हजर केले तेव्हा वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

या राडा प्रकरणात पोलिसांनी आठ जणांना अटक केली होती. त्यांना शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता, त्यापैकी पाच जणांना न्यायलयीन कोठडी सुनावण्यात आली तर तीन जणांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

# वालधुनी पूलाचे बेअरिंग बदलण्याचे काम सुरू

## कल्याणकरांना मिळणार वाहतुक कोंडीतून दिलासा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने वालधुनी पुलाच्या बेअरिंग बदलण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. हे काम कल्याणमधील तिन्ही महत्त्वाच्या आणि अतिवापरात असलेल्या पुलांच्या दुरुस्ती व पुनरुज्जीवनाच्या पहिल्या टप्प्याचे चिन्ह आहे. वालधुनी पूल, एफ-कॅबिन फ्लायओव्हर पूल आणि प्रल्हाद शिंदे पूल या तिन्ही पुलांवर लवकरच मॅस्टिक डांबराचे काम सुरू होणार आहे.

या पुलांच्या खालावत चाललेल्या स्थितीमुळे आणि वारंवार होणाऱ्या खड्ड्यांमुळे दररोज प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. यापैकी वालधुनी पूल हा सर्वाधिक वाहतूक असलेला असून, सध्या या पुलावर संरचनात्मक दुरुस्तीचे मोठे काम सुरू आहे. यात तब्बल 236 बेअरिंग बदलण्याचे काम सुरू असून, हे महत्त्वाचे देखभालकार्य अनेक वर्षांपासून प्रलंबित होते.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, पुलांचे बेअरिंग साधारणतः प्रत्येक 15 वर्षांनी बदलणे आवश्यक असते. मात्र, वालधुनी पुलावरील अत्याधिक वाहतूकभारामुळे हे काम दशकांपासून पुढे ढकलले गेले होते. सुमारे 35 वर्षे जुना वालधुनी पूल हा कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरांदरम्यान प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी जीवनरेखा मानला जातो. दररोज हजारो वाहनं या पुलावरून प्रवास करतात. मात्र, पुलाच्या खराब पृष्ठभागामुळे आणि वारंवार होणाऱ्या खड्ड्यांमुळे नागरिकांना विशेषतः पावसाळ्यात मोठा त्रास होत होता.सध्या केडीएमसीने वाहतूक बंद न करता बेअरिंग बदलण्याचे काम सुरू केले असून, यामुळे पुलावरील वाहतूक सुरळीत सुरू आहे. बेअरिंगचे काम पूर्ण झाल्यानंतर या तिन्ही पुलांवर टप्प्याटप्प्याने मॅस्टिक डांबराचे काम करण्यात येणार आहे. या दरम्यान नागरिकांना कमीतकमी त्रास होईल, यासाठी वाहतूक व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे.

“आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार या पुलांच्या दुरुस्तीला प्राधान्य देण्यात आले आहे, जेणेकरून नागरिकांना सुरक्षित आणि सुरळीत प्रवासाचा अनुभव मिळेल,” असे शहर अभियंता अनिता परदेशी यांनी सांगितले. “मॅस्टिक डांबराच्या थरामुळे पुलांचा टिकाऊपणा वाढेल आणि पुढील पाच वर्षांपर्यंत खड्ड्यांचा त्रास होणार नाही.” या कामादरम्यान वाहतुकीचा तात्पुरता त्रास होऊ शकतो, मात्र केडीएमसी आणि वाहतूक विभागाने त्यासाठी आवश्यक तयारी केली आहे.

# किल्ले स्पर्धांतून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव

## थिराणी विद्यामंदिरात दिवाळीत किल्ले स्पर्धा, आकाशकंदील आणि ग्रीटिंग कार्ड्सच्या कार्यशाळेचे आयोजन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : दिवाळी सणाचे पारंपारिक महत्व विद्यार्थ्यांना कळावे व दिवाळीचा उत्सव हा पर्यावरणपूरक साजरा करावा या उद्देशाने श्रीमती सावित्रीदेवी थिराणी विद्यामंदिर, वर्तकनगर, ठाणे येथे महाराष्ट्रातील किल्ल्यांची प्रतिकृती स्पर्धा, आकाशकंदील आणि ग्रीटिंग कार्ड्स निर्मितीची कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर स्पर्धेत आणि कार्यशाळेत इ. पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

रोटरी क्लब ऑफ ठाणेच्या आवाहनानुसार महाराष्ट्रातील गडकिलाल्यांची प्रतिकृती निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी आवश्यक त्या साधनसामुग्रीची जमवाजमव करून आपल्या कल्पकतेनुसार रायगड, प्रतापगड, तोरणा, सिंधुदुर्ग, पन्हाळागड आणि लोहगड इ. किल्ल्यांच्या अतिशय सुंदर प्रतिकृती निर्माण केल्या. तसेच दिवाळी सणादरम्यान वापरले जाणारे आकाशकंदील, पणत्या आणि ग्रीटिंग कार्ड्स इ. वस्तू पर्यावरणपूरकरित्या तयार केले. सदर कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर आणि आकर्षक असे आकाशकंदील आणि ग्रीटिंग कार्ड्स तयार केले. सर्व कलाकृतीचे प्रदर्शन लावण्यात आले. रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. यामुळे संपूर्ण शालेय परिसराला दिवाळीचे स्वरूप प्राप्त झाले. सदर कलाकृतीच्या प्रदर्शनाला संस्थाचालक, रोटरी क्लब ऑफ ठाणे चे पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

यासाठी कला व सांस्कृतिक विभागाचे शिक्षक, पर्यवेक्षिका सुचिता पारखे आणि मुख्याध्यापक पदमसिंग परदेशी इ. चे मार्गदर्शन लाभले.

# समाज कल्याण न्यास संस्थेच्या माध्यमातून महिलांना साडी, मिठाई तर विद्यार्थ्यांना वह्या वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) शाखा दहागांव, कातबाव व चाफ्याचा पाडा शाखेच्या वतीने आयोजित तथा समाज कल्याण न्यास या संस्थेच्या माध्यमातून येथील महिलांना साडी, मिठाई व विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले.

दिपावली -भाऊबीज सणानिमित्ताने आयोजित या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना वासिंद ग्रामीण प्रमुख रघुनाथ मसणे व आदि कार्यकर्ते यांच्या



मार्गदर्शन व पुढाकाराने करण्यात आले. तर सामाजिक कार्यकर्ते पंडीत मसणे यांचे सहकार्य लाभले होते. यावेळी बिग बॉस मराठी फेम तथा गायक संतोष चौधरी (दादूस) यांनी गायलेल्या गाण्यांवर उपस्थित महिला भगिनी व मुलांनी नाच- गाणे करून मनमुराद आनंद घेतला. शिवसेना शहापूर विधानसभा संपर्क प्रमुख मिलिंद देशमुख, उप तालुका प्रमुख बाळाराम तरणे यांनी मार्गदर्शन केले तर समाज कल्याण न्यासचे सचिव विलास भोईर यांनी संस्थेच्या कार्या विषयी माहिती दिली.

या कार्यक्रमप्रसंगी समाज कल्याण न्यास संस्थापक अध्यक्ष सोन्या पाटील, बिग बॉस मराठी फेम तथा गायक संतोष चौधरी (दादूस), संस्थेचे सचिव विलास भोईर, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर भोईर, शिवसेना (उबाठा) महिला आघाडी जिल्हा संघटक रश्मीताई निमसे, आदिवासी कक्ष जिल्हा प्रमुख जानू हिरवे, तालुका विधानसभा संपर्क प्रमुख मिलिंद देशमुख, महिला आघाडी तालुका संघटक गुलाबताई भेरे, समाज कल्याण न्यास महिला वाडा तालुकाध्यक्षा प्रमिला पाटील, जेष्ठ कार्यकर्ते नागोशेठ मसणे, तालुका सहसंपर्कप्रमुख दत्ता ठाकरे, युवा सेना जिल्हा प्रमुख स्वानंद शेलवले, तालुका विधानसभा समन्वयक गणेश अवसरे, उपतालुकाप्रमुख बाळाराम तरणे, शिवसेना पदाधिकारी चिंतामण जाधव, युवा सेना तालुकाध्यक्ष अतूल भालके, शहापूर शहर प्रमुख हर्षद राऊत, माजी उपसरपंच तथा विद्यमान सदस्य संजय पवार, संजय वारघडे, माजी सरपंच सुरेश पवार, रघुनाथ मसणे, दत्ता चंदे, चेतन काबाडी, गणेश तरणे, राम तरणे, चंद्रकांत पाटील, अविनाश जाधव, हेमंत पाटील, श्याम धानके, अशोक देसले, बाळाराम धानके, गुरुनाथ धानके, योगेश पवार, जयवंत मसणे, संजय भोर, किरण भांगरे, संदीप भांगरे आदी कार्यकर्ते, शिवसैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक सुनील तारमळे यांनी केले तर यासाठी शिवसेना शाखा दहागांव, कातबाव व चाफ्याचा पाडा येथील कार्यकर्ते व शिवसैनिक यांनी परिश्रम घेतले होते.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत
करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन,
रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क,
जाहिरात, चित्रपट निर्मिती,
डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in






**मेष**

भविष्यासाठी नियोजन करण्यात तुम्ही खूप व्यस्त असाल. घेतलेले निर्णय योग्य ठरतील. तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत बसून काहीतरी चर्चा कराल.

**वृषभ**

तुम्हाला एखाद्याच्या माध्यमातून जीवन अनुभवण्याच्या मौल्यवान संधी मिळतील. तुम्ही सामाजिक कार्यात सक्रियपणे सहभागी व्हाल.

**मिथुन**

पदोन्नती मिळण्याची शक्यता आहे. वैयक्तिक समस्या सोडवण्यासाठी तुम्ही मित्राची मदत घेऊ शकता. तुम्हाला सर्जनशील कामांकडे अधिक कल असेल.

**कर्क**

कुटुंबाचा पाठिंबा मिळेल. विद्यार्थी अभ्यास अधिक प्रभावी करण्यासाठी अतिरिक्त वर्ग घेऊ शकतात. खूप दिवसांनी कुटुंबाला भेटण्याची संधी मिळेल.

**सिंह**

मित्रांसोबत चित्रपट पाहण्याची योजना कराल, ज्यामुळे मन शांत होईल. वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्याची संधी मिळेल आणि काम पूर्ण होईल.

**कन्या**

नवीन रोजगाराच्या संधी मिळतील ज्यामुळे तुमचे भविष्य उज्ज्वल होईल. नोकरी बदलण्याची शक्यता आहे, ज्यामुळे तुमचे काम सोपे होईल.

**तूळ**

व्यवसायात चांगला नफा मिळेल आणि तुमच्या घरात भौतिक सुख वाढेल. आर्थिक बाबींबाबत विचारपूर्वक निर्णय घेणे तुमच्यासाठी चांगले राहील.

**वृश्चिक**

तुमच्या मुलांना भेटून तुम्हाला खूप आनंद होईल. भावना मित्रासोबत शेअर करू शकता, ज्यामुळे हलके वाटेल. एखाद्याच्या मदतीमुळे तुम्हाला नोकरी मिळेल.

**धनु**

वैवाहिक जीवन आनंदी राहील आणि चांगली बातमी मिळेल. व्यवसायात आर्थिक नफा मिळेल आणि स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करतील.

**मकर**

राजकीय तज्ञांना भेटाल आणि त्यांच्यासोबत जवळून काम कराल. कर्तव्य खूप चांगल्या प्रकारे पार पाडाल, ज्यामुळे कुटुंबातील सर्वांकडून प्रशंसा होईल.

**कुंभ**

तुमचे लक्ष तुमच्या कामावर असेल, त्यामुळे गोष्टी सहज आणि कार्यक्षमतेने होतील. वैवाहिक जीवन आज गोड राहील.योजना पुढे नेण्याचा विचार कराल.

**मीन**

व्यवसायात तुम्हाला चांगले आर्थिक नफा मिळतील, ज्यामुळे तुम्हाला आनंद मिळेल. आर्थिक अडचणींमुळे रखडलेले काम तुम्ही पुढे नेऊ शकाल.

नियमित
वाचा
दै. ठाणे
जीवनदीप
वार्ता

# डोंबिवलीत महसूल मंत्र्यांच्या सहीने बनावट आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** - बेकायदा इमारती, मालमत्तांचे, पालिकेच्या बनावट बांधकाम परवानग्या तयार करणाऱ्याचे डोंबिवली माहेरघर म्हणून ओळखले जाते. ही बनावट यंत्रणा चालविणाऱ्या माफियांवर गेल्या तीस वर्षात शासन, पोलीस यंत्रणांकडून कधीच कोणती कारवाई न झाल्याने या माफियांना बनावट कागदपत्रे तयार करण्यास बळ मिळत आहे. आता तर राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि त्यांच्या कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी यांच्या बनावट सह्या, शिक्क्यांचा वापर करून डोंबिवलीतील शास्त्रीनगर रुग्णालयाजवळील एका विवादित जमिनीचा बनावट आदेश काढण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीला आला आहे.

हा प्रकार विवादित जमीन तक्रार प्रकरणातील तक्रारदाराच्या निदर्शनास येताच त्यांनी ही माहिती महसूल मंत्री कार्यालयाला दिली. त्यानंतर हा बनावट आदेशाचा प्रकार उघडकीला आला. याप्रकरणी महसूल विभागाने केलेल्या चौकशीनंतर विष्णुनगर पोलीस ठाण्यात कल्याणच्या प्रांत कार्यालयातील महसूल साहाय्यक लक्ष्मण रामचंद्र नांगरे यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात सरकार पक्षार्फे तक्रार केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला आहे.

डोंबिवली पश्चिमेतील महसुली हद्द मौज आयरे कोपर रस्त्यावरील शास्त्रीनगर रुग्णालयाजवळील सर्वे क्र. ३४-५, ३९-११, ४०-१ई, ८६-२ या जमिनीचा हा वाद आहे. जनार्दन सुदाम म्हात्रे विरूध्द आशाबाई कैलास पाटील यांच्यात शास्त्रीनगर रुग्णालयाजवळील जमिनीवरून महसूल विभागाकडे दावे दाखल आहेत. त्यावर सुनावण्या सुरू आहेत. उपविभागीय अधिकारी, जिल्हा महसूल विभाग, कोकण महसूल विभागाकडून हे प्रकरण अंतीम सुनावणीसाठी महसूल मंत्री यांच्याकडे दाखल आहे, असे पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे.

याप्रकरणातील अर्जदार काटईचे सुरज कैलास पाटील यांना रिदम रमेश म्हात्रे यांच्याकडून समजले की महसूल मंत्र्यांकडे असलेल्या शास्त्रीनगर रुग्णालयाजवळील विवादित जमिनीबाबत महसूल मंत्री कार्यालयाने एक आदेश काढला आहे. परंतु, महसूल मंत्री यांच्याकडे विवादित जमिनीची सुनावणी प्रलंबित आहे. याप्रकरणी आम्हाला अद्याप काही कळविले नाही असे असताना हा अंतीम आदेश काढला कोणी, असा प्रश्न सुरज यांना पडला. हा आदेश सुरज पाटील यांना मिळाला. याविषयीची तक्रार सुरज पाटील यांनी महसूल मंत्री कार्यालयाकडे केली. त्यावेळी महसूल विभागाने केलेल्या चौकशीत तो बनावट आदेश महसूल मंत्री, तेथील विशेष कार्य अधिकारी कुंदनकुमार सोनवणे यांच्या बनावट सही, शिक्क्याने काढला असल्याचे निष्पन्न झाले. या आदेशाचा नस्ती क्रमांक महसूल मंत्री कार्यालयाशी विसंगत असल्याचे आढळले. महसूल मंत्री कार्यालयाच्या आदेशावरून जिल्हाधिकारी कार्यालयाने हे बनावट कागदपत्र तयार करणाऱ्या अज्ञात इसमावर कारवाई करण्याचे आदेश कल्याणचे उपविभागीय अधिकारी विश्वास गुजर यांना दिले.

गुजर यांच्या आदेशावरून उपविभागीय कार्यालयातील महसूल साहाय्यक लक्ष्मण नांगरे यांनी याप्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. गेल्या दोन महिन्याच्या कालावधीत महसूल मंत्र्यांच्या सहीचा आणि कार्यालयाचा बनावट आदेश अज्ञाताने काढला आहे. मागील पाच वर्षापासून शास्त्रीनगर रुग्णालयाजवळील विवादित जमीन प्रकरणाच्या महसूल विभागाकडे सुनावण्या सुरू आहेत. पोलीस उपनिरीक्षक नवनाथ वाघमोडे याप्रकरणाचा तपास करत आहेत.

# शिवसेनेचे माजी आमदार सुभाष भोईर भाजपच्या वाटेवर ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शिवसेनेतील फुटीनंतरही उद्धव ठाकरे यांची साथ देणारे कल्याण ग्रामीणचे माजी आमदार सुभाष भोईर यांनी नुकतीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. ठाणे आणि कल्याण महापालिका निवडणुकीच्या तोंडावर भोईर यांनी घेतलेली भेट राजकीय दृष्ट्या महत्वाची मानली जात असून या भेटीच्या निमित्ताने भोईर भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा रंगली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे कट्टर विरोधक म्हणून भोईर ओळखले जात असून त्यांनी मनसेचे माजी आमदार राजू पाटील आणि भाजपच्या नेत्यांशी भोईर यांनी जुळवून घेतल्याचे बोलले जात आहे. शिवसेनेतील फुटीनंतरही अनेक आजी-

**भोईर हे ठाणे महापालिकेचे नगरसेवकही होते. कल्याण ग्रामीण मतदार संघात ठाणे आणि कल्याण महापालिकांचा परिसर येतो. यामुळे दोन्ही महापालिकांच्या क्षेत्रात त्यांनी यापुर्वी प्रतिनिधीत्व केले आहे. याच भागात ते शिवसेना (उबाठा) पक्षाचे नेतृत्व करीत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या तोंडावर राजकीय हालचाली वाढल्या असतानाच, माजी आमदार सुभाष भोईर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळया चर्चा रंगल्या असून या भेटीच्या निमित्ताने ते भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा रंगली आहे.**



माजी आमदार, नगरसेवकांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांची साथ दिली होती. मात्र, माजी आमदार भोईर यांनी उद्धव ठाकरे यांची साथ दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे कट्टर विरोधक म्हणून भोईर ओळखले जातात. यातूनच त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात होते. यंदाच्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला.

### मुख्यमंत्र्यांची सकारात्मकता

**दक्षिणेकडून उत्तरेकडे जाणारा हा एकमेव महामार्ग आहे. हा महामार्ग महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीत येतो. हा चार पदरी महामार्ग अपुरा पडत असून तो आठ पदरी केल्यास मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी दूर होवून प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. या महामार्गावरून पुणे, मुंबई तसेच कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावार वाहतूक होत असते. या महामार्गावर अवजड वाहन बंद पडले अथवा अपघात झाला तर या महामार्गावर प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे कल्याण फाटा ते कळंबोली महामार्ग आठ पदरी करण्याची मागणी माजी आमदार सुभाष भोईर यांनी केली असून त्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मकता दर्शविली आहे.**

**माजी आमदार सुभाष भोईर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून या भेटीदरम्यान, भोईर यांनी मागण्यांचे एक पत्र त्यांना दिले. जुना मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर कल्याणफाटा ते कळंबोली पर्यंत मोठ्या प्रमाणावर अवजड वाहनांची वाहतूक होत असते. उरण जे.एन.पी.टी. बंदरातून दररोज सुमारे वीस ते पंचवीस हजार कंटेनर, अवजड वाहने नाशिक, गुजरात तसेच इतर राज्यांमध्ये वाहतूक करीत असल्यामुळे वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागतो. याच परिसरात लोकनेते दि. बा. पाटील नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यामुळे या महामार्गावरून भविष्यात मोठ्या प्रमाणावर वाहतूक वाढणार आहे. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेला चार पदरी महामार्ग आठ पदरी करावा अशी मागणी त्यांनी पत्रात केली आहे. त्यावर सकारात्मकता दर्शवून तातडीने प्रस्ताव तयार करण्यास मुख्यमंत्र्यांनी सबंधीताना सांगितल्याचे भोईर म्हणाले.**

# फटाक्यांमुळे प्रदुषणात वाढ

## ठाणे शहरातील हवेच्या गुणवत्तेत घसरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - यंदा दिवाळीच्या काळात फटाके वाजविण्याच्या प्रमाणात वाढ झाल्याने ठाणे शहरातील हवेच्या गुणवत्तेत घसरण झाल्याची बाब समोर आली आहे. यंदा दिवाळीपूर्वी आणि आणि दिवाळीच्या काळातील हवेची गुणवत्तेचा ठाणे महापालिकेच्या प्रदुषण विभागाने अभ्यास केला असून त्यात लक्ष्मीपूजनाच्या दिवशी हवा प्रदूषणाच्या पातळीत सरासरी ११.१ टक्के वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तर, दिवाळीच्या कालावधीत ध्वनीच्या पातळीत ३.२ टक्के वाढ झाल्याची माहिती पुढे आली आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होताना दिसून येत आहे. यंदा दिवाळीत फटाके वाजण्याच्या प्रमाणातही वाढ झालेली आहे. मात्र, संध्याकाळच्यावेळी झालेल्या पावसामुळे तेवढ्या काळात प्रदूषणापासून काहीसा दिलासा मिळाला आहे, असा दावा पालिका प्रशासनाने केला आहे. गेल्यावर्षी म्हणजेच, २०२४ मध्ये दिवाळी कालावधीतील हवेच्या गुणवत्तेशी तुलना केली असता, यंदा हवेतील प्रदूषणाच्या पातळीत ७.२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. मागील ३ वर्षाच्या दिवाळीच्या कालावधीतील हवा प्रदूषणाचे मूल्यमापन केले असता, २०२३ मध्ये दिवाळी कालावधील हवा गुणवत्ता निर्देशांकामध्ये ६२.६ टक्के इतकी वाढ झाली. तर, २०२४ मध्ये दिवाळी कालावधीत निर्देशांकात ३३.९ टक्के वाढ झाली होती, असे निदर्शनास आल्याचे पालिका प्रशासनाने म्हटले आहे. ठाणे महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाने ठाणे शहरात दिवाळी २०२५ कालावधीतील हवेच्या गुणवत्तेचा अभ्यास केला. मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांच्या मार्गदर्शनाखाल उप पर्यावरण अधिकारी विद्या सावंत आणि ज्युनिअर केमिस्ट ओमसत्याशिव परळकर यांनी हा अभ्यास केला. यामध्ये दिवाळी पूर्व आणि दिवाळी कालावधीत म्हणजेच लक्ष्मीपूजन दिवशी ठाणे शहरातील हवेची गुणवत्ता तपासण्यात आली.



# शंभुदुर्ग संघटनेची वृद्धाश्रम आणि अनाथ आश्रमात दिवाळी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शंभुदुर्ग संघटनेच्या वतीने दिवाळी उत्सव निमित्ताने कर्जत येथील हॅपी फॉल्क फाउंडेशन वृद्धाश्रमात वृध्द मतापित्यांसोबत तसेच भिवपुरी येथील अनाथ आश्रमात "अनाथांच्या सोबत दिवाळी" या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या कार्यक्रमाप्रसंगी शंभुदुर्ग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आदेश चौधरी, महासचिव संजय चौधरी, कार्याध्यक्ष मोहन डोहळे, प्रवक्ते रुपेश गायकर, खजिनदार विलास जाधव, जिल्हाध्यक्ष सागर मोरे, संपर्क प्रमुख संजय लोंढे, कर्जत ता. अध्यक्ष विनोद भोईर, रायगड ता. अध्यक्ष परशुराम माळी, जिल्हा कार्यकारणी सर्व तालुका कार्यकारणी पदाधिकारी, सदस्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली.

संस्थेच्या वतीने वृद्ध मातापित्यांना गोड जेवण देऊन वृद्धांना आरोग्याच्या दृष्टीने उपयोगी ठरेल असे हेल्थ किट व मिठाई तसेच ब्लँकेट चे वाटप करण्यात आले. अनाथ आश्रमात मुलांच्या सोबत फटाके लाऊन त्यांचा आनंद द्विगुणीत करत दिवाळी मोठ्या उत्साहात, आनंदात साजरी करण्यात आली.

# वसई विरारची क्लस्टर प्रक्रिया रखडली !


दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई** : शहरातील अनधिकृत तसेच धोकादायक इमारतींमुळे निर्माण होणाऱ्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी समूह पुनर्विकास (क्लस्टर) योजना राबविण्यात येणार आहे. यासाठी काही ठिकाणांचे सर्वेक्षण ही करण्यात आले आहे. मात्र त्या प्रक्रियेला गती मिळत नसल्याने मागील काही महिन्यांपासून प्रक्रिया थंडावली आहे. आता उच्च स्तरीय समितीच्या बैठकीनंतरच यावर निर्णय घेतला जाणार आहे.

वसई विरार शहरात मागील काही वर्षांपूर्वी विविध ठिकाणच्या इमारती उभारल्या आहेत. त्यात काही अनधिकृत इमारतींचा समावेश आहे. अशा इमारतींमध्ये मोठ्या संख्येने नागरिक वर्षानुवर्षे राहत आहे. मात्र काहींनी इमारतींची वेळोवेळी डागडुजी व दुरुस्तीकडे लक्ष न दिल्याने त्या इमारती जीर्ण होत आहे. अशा जीर्ण झालेल्या इमारतीत नागरिकांना जीव मुठीत धरून राहावे लागत आहे. दिवसेंदिवस अशा धोकादायक इमारतींचा प्रश्न गंभीर होत आहे. धोकादायक इमारतींमुळे अनेक कुटुंब बेघर ही होत असतात. यावर तोडगा काढण्यासाठी धोकादायक व बेकायदा इमारतींचा समुह पुनर्विकास (क्लस्टर योजना) योजनेतून विकास केला जाणार आहे.

या समुह विकास योजनेच्या माध्यमातून शहराचे वेगवेगळे भाग विकसित करण्यात येणार आहेत. यासाठी पालिकेने पहिल्या टप्प्यात ४० ठिकाणे ही निश्चित करून त्यांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. मात्र मागील काही महिन्यांपासून या पुनर्विकास प्रकल्पाच्या प्रक्रियेला गती मिळत नसल्याने ही प्रक्रिया थंडावली आहे. या प्रक्रियेला गती देण्यात यावी अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

समूह पुनर्विकास करण्यासाठी ४० ठिकाणे निश्चित केली आहेत. यात नालासोपारा येथील



बिलालपाडा, धानिव, पेल्हार, वालईपाडा, मोरेगाव, तुळींज, वसईतील गोखीवरे, नवघर -माणिकपूर, विरार, नारिंगी अशा ठिकाणी असलेल्या इमारतींचा पुनर्विकास केला जाणार आहे. यात विशेषतः ज्या भागातून बुलेट ट्रेन, विरार अलिबाग कॉरिडॉर यासह केंद्र व राज्य शासनाचे महत्वाकांक्षी प्रकल्प आहेत त्या ठिकाणांचा समावेश आहे. त्यासाठी स्वतंत्र आराखडे तयार केले जाणार आहेत असे पालिकेने सांगितले आहे.

### खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत

# अंबरनाथच्या दोन माजी नगरसेवकांचे शिवसेनेत पक्षांतर

पान १ वरून ▶▶▶

शिवसेनेकडून जोरदार मोर्चेबांधणी सुरू करण्यात आली आहे. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या अनेक महत्वाच्या नेत्यांच्या माध्यमातून विभाग निहाय आढावा बैठकांचे सत्र सुरू आहे. तर विविध पक्षातील नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश देखील होत आहेत. याच पार्श्वभूमीवर नुकताच अंबरनाथ पश्चिमेतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी नगरसेवक उमर दादामिया इंजिनियर आणि भारतीय जनता पक्षाच्या माजी नगरसेविका दिपा गायकवाड यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. यावेळी खासदार श्रीकांत शिंदे उपस्थित होते. यावेळी नव्याने प्रवेश करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे आणि पदाधिकाऱ्यांचे शिवसेना परिवारात स्वागत करण्यात आले.



**अंबरनाथ शहरात शिवसेना एक मजबूत पक्ष आहे. यापूर्वी पालिकेत शिवसेनेचीच सत्ता होती. शहरात भाजपचे विस्तारण्यास सुरुवात केली आहे. भाजपने गेल्या काही महिन्यात पालिका प्रशासनाचे विविध मुद्द्यांवर वाभाडे काढले आहेत. मोर्चा आणि आंदोलनाच्या निमित्ताने पालिकेला जाब विचारला आहे. गेल्या पाच वर्षात पालिकेवर प्रशासकीय राजवट असली तरी शिवसेनेचेच वर्चस्व आहे. त्यामुळे भाजपने शिवसेनेलाच लक्ष्य केल्याचे बोलले जाते. मात्र शिवसेनेनेही शहरात पुन्हा ताकद दाखवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे या पालिका निवडणुकीत शिवसेना विरुद्ध भाजप असा थेट सामना होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.**


# आनंद दिघे नाट्यगृह सलग पाचव्या दिवशी हाउसफुल

## आज सादर होणार जयवंत दळवी यांच्या 'पुरूष' नाटकाचा प्रयोग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : अंबरनाथ नगरपालिकेच्या नव्याने उद्घाटन झालेल्या धर्मवीर आनंद दिघे नाट्यगृहात सध्या नाट्य महोत्सव सुरू आहे. या नाट्यमहोत्सवाच्या निमित्ताने दर्जेदार नाटके अंबरनाथकरांसाठी मोफत आयोजीत करण्यात आली आहे. बुधवारी विजय तेंडुलकरांच्या सखाराम बाईंडर नाटकासाठी नाट्यगृह अक्षरशः खचाखच भरले होते. या प्रयोगासाठी लोकप्रतिनधींसह अनेकांनी खाली बसकन मारून तीन तासांचे नाटक पाहिले. गुरुवारी देवबाभळी नाटकालाही प्रेक्षकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला. येत्या रविवारपर्यंत आणखी तीन नाटके अंबरनाथकरांना पाहता येणार आहेत.

शहरासाठी स्वतंत्र आणि अद्ययावत नाट्यगृहाचे अंबरनाथकरांचे स्वप्न गेल्या रविवारी पूर्ण झाले. स्थानिक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या नाट्यगृहाचे लोकार्पण संपन्न झाले. यावेळी नाट्य, सिने क्षेत्रातील नामवंत कलावंतांनी हजेरी लावली होती. त्यानंतर खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते येथे आठ दिवस नाट्यमहोत्सव आयोजीत करण्यात आला. त्यामुळे अंबरनाथ आणि आसपासच्या रसिकांना दर्जेदार नाटकांचा मोफत आस्वाद घेता येतो आहे. त्यानिमित्त सध्या गाजत असलेली वेगवेगळ्या धाटणीची नाटके येथे आयोजीत करण्यात



आली आहेत.

उद्घाटनाच्या दिवशी भरत जाधव यांचे पुन्हा सही रे सहीचा प्रयोग हाउसफुल्ल झाला. दुसऱ्या दिवशी करून गेलो गाव या विनोदी नाटकाने रसिकांना भूरळ घातली. तिसऱ्या दिवशी आज्जीबाई जोरात हे नाटक रसिकांनी डोक्यावर घेतले. बुधवारी विजय तेंडुलकर लिखीत सखाराम बाईंडर या नाटकासाठी दुपारी तीन वाजल्यापासून प्रेक्षकांनी नाट्यगृहात गर्दी केली होती. नाटक सुरू होण्यापूर्वी तासभर आधीच नाट्यगृह पूर्ण क्षमतेने भरून गेले.

त्यानंतर अनेकांनी नाट्यगृहात खालीच बसकन मारून नाटक पाहिले. अनेकांनी तब्बल तीन तासांचा प्रयोग उभ्याने पाहिला. शहरातील अनेक माजी लोकप्रतिनिधींनीही खाली बसकम मारून अंबरनाथकरांसह नाटकाचा आस्वाद घेतला. तर गुरूवारी देवबाभळी नाटकही हाऊसफुल्ल झाले.

अंबरनाथच्या या नाट्यगृहात शुक्रवारी गूढ आणि थरारक धाटणीचे मी वर्सेस मी या नाटकाचा प्रयोग होईल. तर शनिवारी जयवंत दळवी यांच्या पुरूष नाटकाचा प्रयोग आयोजीत करण्यात आला आहे. या नाट्य महोत्सवाचा समारोप शिवबा या महानाट्याने होणार आहे.




# ठाण्यातील रस्त्याला पद्मश्री शारदा सिन्हा मार्ग नामकरणाची मागणी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे येथील वागळे इस्टेट परिसरात उत्तर भारतीय नागरिक मोठ्या प्रमाणात वास्तव्यास आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सहकार्यांने अनेक वर्षापासून हजारो भाविक भक्त रोड नं.16 येथील रायलादेवी तलाव येथे छठ पुजजेचे आयोजन केले जाते. दि. 05 नोव्हेंबर 2024 रोजी छठ गीत गायिका पद्मश्री शारदा सिन्हा यांचे निधन झाले आहे. त्यामुळे रोड नं.16 चे नामकरण पद्मश्री शारदा सिन्हा छठ मार्ग केल्यास छठ वासियां सोबत शारदा सिन्हा यांना आदरांजली दिली जाईल. अशी मागणी शिक्षण शक्ती संघटनेचे अध्यक्ष कुंवर राकेश राजाबेटी गंभीर सिंह तोमर यांनी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य शासन, मुंबई यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# राजे संस्कार प्रतिष्ठानमुळे आदिवासी कुटुंबीयांची दिवाळी गोड



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : धावपळीच्या व बदलत्या युगात, संकूचीत विचारत गुंतत चाललेला समाजात, मदतीचा हात कुठेही, केव्हाही, समाजसेवेचे वेड लागलेली संस्था असा नावलौकीक असलेल्या राजे संस्कार प्रतिष्ठानमुळे ठाणे जिल्हयातील अनेक आदिवासी पाडे, वस्त्या होतायेत तेजोमय.. राजे संस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष व ठाण्यातील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातील प्राध्यापक संभाजी शेळके यांचे मार्गदर्शनाखाली राजे संस्कार' प्रतिष्ठान संस्थेचे चार्टर्ड अकाउंटंट मंदार आणि वैदेही गाडगीळ यांच्या सहकार्याने

## राजे संस्कार प्रतिष्ठान संस्थेचा माणूसकीचा हात पुढे

आणि गुरूवर्य सुकांत देशपांडे आणि श्रीमती हेमांगी गाडगीळ यांनी दि.20 ऑक्टोबर 2025 रोजी आदिवासी पाडे व वस्त्यांमध्ये जाऊन त्यांची दिवाळी केली गोड.

दिवाळी सण म्हटले की अभ्यंगस्नान, नरकचतुर्दशी, सगळीकडे आनंदी आनंद, रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी होत असते. असा आनंद सर्वत्र साजरा होत असताना ठाणे शहरालगत असणारे अनेक आदिवासी पाडे, वस्त्यांमध्ये आजही दिवाळी सण गरिबीमुळे साजरा होत नाही. तेथे ना रांगोळी, ना लाडू - चिवडा, ना करंजी आसे कोणतेही पदार्थ बनवले जात नाहीत. आसेच आदिवासी दिवाळी सनापासून वंचित असल्याची माहिती संजय इदे यांच्याकडून राजे संस्कारचे अध्यक्ष प्रा. संभाजी शेळके यांना कळताच त्यांनी या आदिवासींच्या अंगणात रोषणाई, फटाक्यांची आतषबाजी होऊन त्यांची दिवाळी गोड करण्यासाठी माणूसकीचा हात पुढे केला. राजे संस्कार प्रतिष्ठानने ठाणे जिल्हयाच्या मुरबाड तालुक्यातील कोल्हेवाडी गावातील आदिवासी कातकरी वस्तीतीच्या ४० कुटुंबीयांना दिवाळीनिमित्त फराळाचे वाटप करून दिवाळीचा सण गोड करण्यात आला. त्याचप्रमाणे आदिवासी भगिनींना साड्या व लहान मुलांसाठी खाऊचे वाटपही करण्यात आले. त्यात संजय ईदे सर, रवींद्र चंदणे यांचाही सहभाग लाभला.

# कुंरूद गृप विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या सभापतीपदी भगवान सांबरे



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील १० गांवामध्ये विस्तार असलेल्या व १४८५ शेतकरी सभासद असलेल्या कुंरूद गृप विवीध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या सभापतीपदी भगवान सांबरे यांची बिनविरोध निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. मावळते सभापती उमेश ठाकरे यांनी ठरल्याप्रमाणे राजीनामा दिल्याने हे पद रीक्त होते त्यानुसार निवडणूक अध्यासी अधीकारी एल. व्ही. भेरे यांच्या अध्यक्षतेखाली एक खास सभा कुंरूद येथील सोसायटी कार्यालयात घेण्यात आली यावेळी सभापती पदासाठी भगवान पांडुरंग सांबरे

## सभापती पदासाठी भगवान पांडुरंग सांबरे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची सभापती पदावर निवड झाल्याचे घोषित करण्यात आले.

यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची सभापती पदावर निवड झाल्याचे घोषित करण्यात आले. यावेळी उपसभापती विष्णू जाधव, संचालक सचीन पाटील, दयानंद पाटील, विलास पाटील, मोहन शेलार, विजय पाटील, जयश्री पाटील, साईनाथ पाटील, प्रकाश पाटील, विनोद पाटील, महेंद्र पाटील, मधुकर मिरकुटे, दिपक जाधव, तारामती शेलार उपस्थित होते. तर निवडणूक दरम्यान सचीव म्हणुन आदेश जाधव यांनी काम पाहिले. सांबरे यांची निवड होताच शेतकरी सहकारी भातगिरणी संचालक विकास पाटील, पडघा सरपंच रविंद्र विशे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दत्तात्रेय पाटोळे, विद्यमान संचालक प्रकाश भोईर, मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाप्रमुख शैलैश बिडवी, तळवली सेवा सोसायटीचे सभापती काशीनाथ शेलार, सेवानिवृत्त सहकारी अधिकारी शांताराम पाटील, अजय पाटील रमेश शेलार, सहसचिव अरुणा पाटील, पडघा सोसायटीचे सचिव ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# ऐन दिवाळीत मुरबाड तालुका अंधारात

## वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने मुरबाड तालुक्यात प्रचंड नुकसान!



**तालुक्यातील शेतकऱ्यांनी तयार झालेले भाताचे पिकाचे कापणीस नुकताच सुरवात केली होती. वर्ष भर मेहनत करून पिक घरी येण्या अगोदरच पावसाने तडाखा दिल्याने शेतकऱ्यांचे मंगळवारी झालेल्या पावसाने मोठे नुकसान झाले आहे. शासनाने सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी**
**- सुभाष घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य.**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : ऐन दिवाळी सणात लक्ष्मी पूजनाच्या संध्याकाळी अचानक आलेल्या चक्रीवादळ व मुसळधार पावसाने मुरबाड तालुक्याच्या ग्रामीण भागात शेतीसह घरांचे, झाडांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या वादळाचा वेग इतका प्रचंड होता की रस्त्यावरील झाडे, झुडपे मुळासकट कोसळून रस्ते बंद झाले होते. मुसळधार पावसाने कापणीला आलेले शेतातील भाताचे उभे पिक आडवे होऊन पाण्यात पडल्याने तालुक्यातील शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला आहे. ऐन दिवाळी सणात मंगळवारी लक्ष्मी पूजनाच्या तयारी आधीच वादळी पावसाने धुमाकूळ घातल्याने महावितरणचे विद्युत पोल, तारा जमिनदोस्त झाल्या आहेत तर अनेक ठिकाणी लाईनवर झाडे पडल्याने ग्रामीण भागातील विज पुरवठा दोन दिवस ख़ंडीत झाला होता.ऐन सणासुदीत लाईट नसल्याने दिवाळी अंधारात साजरा करावी लागली असल्याने नागरिकांनी मुरबाड विजवितरण कंपनीवर नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान शेतकरी राजा पून्हा संकटात सापडला असून कापनीला आलेले भाताचे नुकसान झाले आहे. शासनाने झालेल्या नुकसानीचे पून्हा पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी व शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# बांगलादेश महिला क्रिकेट संघासोबत स्काऊट्स आणि गाईड्स यांचा सुसंवाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे**: युनिसेफ आणि भारत स्काऊट्स अँड गाईड्स, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने ICC Women's Cricket World Cup India 2025 या स्पर्धेच्या निमित्ताने डी. वाय. पाटील स्टेडियम, नवी मुंबई येथे आयोजित कार्यक्रमात बांगलादेश महिला क्रिकेट संघासोबत ठाणे भारत स्काऊट्स आणि गाईड्स यांना सुसंवाद साधण्याची तसेच क्रिकेट खेळण्याची एक अद्वितीय संधी प्राप्त झाली. दिवाळी सणासुदीच्या काळात ही सुवर्णसंधी साधत ठाणे भारत स्काऊट्स अँड गाईड्स अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील स्काऊट्स आणि गाईड्स यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून उल्लेखनीय कार्य केले. यावेळी युनिसेफ कार्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विशेष बससेवा, आरोग्यदायी नाश्ता, स्वादिष्ट भोजन, शीतपेय (कोल्ड ड्रिंक) तसेच टी-शर्ट व हॅट यांची सुंदर आणि सुव्यवस्थित अशी व्यवस्था करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना सुखद आणि आनंददायी अनुभव मिळावा यासाठी प्रत्येक बाबतीत अत्यंत बारकाईने आणि नियोजनपूर्वक तयारी करण्यात आली होती. ही विशेष संधी भारत स्काऊट्स अँड गाईड्स (BSG) साठी उपलब्ध करून देण्याचे श्रेय राज्य चिटणीस मिलिंद दीक्षित यांना जाते. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा संघटक हेमांगी पाटील यांनी अत्यंत प्रभावी नेतृत्व, उत्कृष्ट समन्वयक कौशल्य आणि अप्रतिम आयोजन क्षमता प्रदर्शित केली. संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी युनिसेफचे समन्वयक डॉ. तानाजी पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# भिवंडी महसूल विभागाचे महाराजस्व अभियान ठरले अव्वल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : आगामी होणाऱ्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूकीची तयारी उपविभागीय अधिकारी अमित सानप व तहसीलदार अभिजित खोले यांच्या उपस्थितीत सुरू झाली असतानाच ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडीत महसूल विभागा तर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले. उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी तहसीलदार अभिजित खोले यांच्या नेतृत्वा खाली महसूल विभागाने तीन टप्प्यात पाणंद रस्ते ,आदिवासी कातकरी समाजासाठी घरकुल तर आदिम कातकरी उत्थान कार्यक्रमात,आरोग्य शिबिर, जातीचे दाखले ,आधारकार्ड अशा विविध लोक उपयोगी सेवा लोकांना उपलब्ध करून देण्यात महसूल विभाग यशस्वी झाल्याची माहिती कार्यालयातून देण्यात आली.

पहिल्या टप्प्यात तालुक्यातील पाणंद शिवार रस्ते विषयक मोहीम राबविली.ज्यामध्ये तालुक्यातील २४० गावांमधील गाव नकाशावर नोंद असलेले ४१२ रस्ते तर गाव नकाशावर नोंद नसलेले ६८६ अशा एकूण १०९८ रस्त्यांचा शोध घेऊन पहिल्या टप्प्यात ८ गावांमधील २५ रस्त्यांचे सीमांकन करण्यात आले आहे.तर १०७३ उर्वरित रस्त्यांची तपासणी व




मोजणी करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला आहे.दुसऱ्या टप्प्यात ५५ घरकुल आदेश वाटप करण्यात आले ज्यामधील वनपट्टे जागे वरील ४०,गावठाण जागेवरील १५ घरकुलांचा समावेश आहे.यासोबत ४७ घरकुल धारकांना स्वामित्व हक्क प्रदान करण्यात आले .तर २७ कुटुंबियांना कातकरी घरठाणाचे आदेश वितरण करण्यात आल्याची माहिती तहसीलदार अभिजित खोले यांनी दिली.

तिसऱ्या टप्प्यात पाये नाईक पाडा, महाळुंगे येथील गोठणपाडा, मथे पाडा, पिरपाडा, म्हणपाडा, घोटगाव पाडा, ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे, कुंदे गावातील घाटणेपाडा, इजर

## हजारो लोकांना दाखले घरकुल मंजूर

पाडा, कातकरी वाडी असलेल्या करमाळा, चिंचवली , दुधणी येथे तर शेलार गावाच्या हद्दीतील आदिवासी पाडा,धातला तलाव, सरपंच पाडा, बोरपाडा,कासार पाडा,मिठपाडा,अत्तर नगर,आदिवासी कॉलनी अशा विविध ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरामध्ये आरोग्य तपासणी,बालकांचे लसीकरण करण्यात आले तर आधारकार्ड,आयुष्यमान भारत कार्ड,जातीचे दाखले ,उत्पन्न दाखले जन्मनोंद अशा आवश्यक दाखल्यांचे वितरण केले.यामध्ये ४६ जणांना आधारकार्ड, ३५ जणांना आयुष्यमान भारत कार्ड, ३३७ जणांना जातीचे दाखले,२२ जणांना उत्पन्न दाखले, १४८ कातकरी विद्यार्थ्यांची जन्मनोंद आदेश पारित करण्यात आले.या महाराजस्व अभियान अंतर्गत ६८९ जणांना विविध सेवांचा लाभ मिळाला तर १२९ जणांना घरकुल मिळवून देण्यासाठी सहाय्य केल्याची माहिती उपविभागीय अधिकारी अमित सानप व तहसीलदार अभिजित खोले यांनी दिली असून सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हे अभियान यशस्वी करण्यासाठी विशेष मेहनत घेतल्याचे त्यांनी सांगितले.

# पडघा सरपंच रविंद्र विशे यांचा राजीनामा

## भरघोस विकासकामे केल्याची पत्रकार परिषदेत माहिती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पडघा** : राजकीय दृष्ट्या महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या व चांगले उत्पन्न असलेल्या पडघा ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र विशे यांनी राजीनामा दिल्यानंतर भरघोस विकासकामे केल्याची माहिती आयोजीत पत्रकार परिषदेत दिली.

सरपंच रविंद्र विशे यांनी राजीनामा दिल्यानंतर सोमवारी ग्रामसचीवालय सभागृहात पत्रकार परिषद घेण्यात आली. त्यात त्यांना मिळालेल्या १० महीन्याच्या कार्यकाळात जिल्हा परिषद शाळेची संरक्षण भिंत, शाळेचा स्टेज, पत्राशेड, मूलां,मुलीसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह बांधकाम, शारदा विद्यालय येथे पेव्हर ब्लॉक, शाळेसाठी ध्वज स्तंभ, पडघा भादाणे रोडवरील बैठक हॉल येथे पेव्हर ब्लॉक रस्ता, संत रोहिदास नगर येथे मागासवर्गीय निधीतून (पंधरा टक्के) समाजोपयोगी भांडी वाटप, अपंगांना 5 टक्के मधुन आर्थिक सहाय्याचे धनादेश वाटप, वेताळ पाडा येथे पेव्हर ब्लॉक रस्ता, स्वामी विवेकानंद वाचनालय येथे शौचालय बांधकाम, पोलीस स्टेशन रोड रुंदीकरण व गटार बंदीस्त, गणेश नगर येथे नवीन स्मशानभूमी बांधणे, अचानक नगर येथे पेव्हर ब्लॉक रस्ता तयार करणे. पडघे गावात विविध ठिकाणी खुर्ची व बाकडे वाटप, अशी २८ विकासकामे केल्याची माहीती सरपंच रविंद्र विशे यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसेच पडघा गांवासाठी वातानुकूलित शव वाहिनी उपलब्ध करून देण्यात आली असुन पंचशील नगर येथे लवकरच प्रवेशद्वार बांधण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले यावेळी ग्रामपंचायत अधिकारी भास्कर घुडे, उपसरपंच अलका मोरे, माजी सरपंच व विद्यमान सदस्य शैलेश बिडवी, प्रभावती जाधव माजी उपसरपंच व विद्यमान सदस्य अभिषेक नागावेकर निता दास,नयना जाधव, मयुरेश गंधे, सदस्य सायली पाटील, चंदा साळुंखे माजी सरपंच संजय जाधव, माजी उपसरपंच गुरुनाथ मोरे, अविनाश दास उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश गायकवाड यांनी केले.










Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024